नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१९/१/२००९

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये सोमवार दि. १९/१/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे जानेवारी २००९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. ४५८**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(गवनि)/१०२७, दि. १५/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७२४, दि. ६/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी खानावळ (मेस) सुरु करणेसाठी केटरर्स निश्चित करण्याचा अधिकार मा.महा.आयुक्त व मा.अति.महा.आयुक्त(ज) यांना देण्यास, तसेच सदर खानावळीमध्ये येणाऱ्या खर्चापैकी ५०% मनपाने देण्यास व येणारा खर्च मागासवर्गीय कल्याण निधीतून करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४५९**

संदर्भ :– १) मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि. २२/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७३८, दि. ६/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

हडपसर स.नं. २२३/४ अ पारिजातक कॉलनीमध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसवून ट्रिमिक्स पध्दतीने रस्ता गदादे यांचे घरापासून सिरम कंपनी रस्त्यापर्यंत रस्ता कॉंक्रीट करण्याचे १० लाखाचे हडपसर क्षेत्रिय कार्यालय येथे टेंडर मंजूर झालेले आहे व वर्कऑर्डरही दिलेली आहे.
सदर विभाग मनपा नविन हद्दीमध्ये आहे. सदर रस्ता गुंठेवारीमध्ये आहे. सदर विभागातील बांधकामे गुंठेवारी पध्दतीने झालेली आहेत. सदर रस्ता अनधिकृत ले–आऊट करुन मुळ मालकाने भुखंड विकताना खरेदी खतामध्ये रस्ता व रस्त्याचा वापर करण्याचे हक्कही दिलेले आहेत व त्यातील रस्त्याचा काही भाग मुळ मालकांच्या नावाने व त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर शिल्लक आहे. सदर अनधिकृत ले–आऊटमधील भूखंडाची विक्री झालेपासून सदर रस्ता नागरिकांच्या १८ वर्षापेक्षा जास्त काळ वहिवाटीचा आहे.

सदर भागातील नागरिकांनी रस्ता ताब्यात देण्याचे सामुहिक पत्रही दिलेले आहे. सदर रस्त्याचा मालक व त्यांचे नातेवाईक एफ.एस.आय.मागतात व रस्ता करणेसाठी अडथळा आणतात. दि. ९/५/२००५ रोजी मा.सहाय्यक आयुक्त यांचे समवेत झालेल्या निर्णयानुसार कलम २ व ३ मध्ये दिलेल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये स्थायी समितीची मान्यता घेऊन मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने नोटीस देवून रस्ता करण्यास मान्यता घेण्यास व मा.मुख्य सभा ठराव क्र. १९३, दि. २३/८/२००२ अन्वये समाविष्ठ गावातील गुंठेवारी पध्दतीने झालेल्या क्षेत्रातील रस्त्याबाबत मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास तसेच ठरावाची अंमलबजावणी बाबत मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता घेवून रस्ता करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

**विषय क्रं. ४६०**

संदर्भ :- १) मा.दिपक गावडे व मा.सागर माळकर यांचे दि. २३/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७४१, दि. ६/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.११४ पर्वती जनता वसाहत येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणेसाठी र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान नं. २३२, अ.क्र. ५, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी एस–१९), पान क्र. ३०४, अ.क्र. ३४, वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत साईबाबा मंदिर व राममंदिर परिसरातील डोंगरावर सुलभ शौचालय बांधणे. | १५ लाख | --- |
| पान क्र. ३०४, अ.क्र. ३५, वॉर्ड क्र. ११४ सुवर्णयुग मंडळ परिसरातील डोंगरावर सुलभ शौचालय बांधणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.११४ पर्वती जनता वसाहत येथे १० लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी बांधणे. | --- | २५ लाख |

**विषय क्रं. ४६१**

संदर्भ :- १) मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी व मा.बाळासाहेब कापरे यांचे दि. २४/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७४२, दि. ६/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १४ त्रिदलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सुरु असून हे काम पूर्ण करणेसाठी असणारी तरतूद कमी पडत असल्याने त्यासाठी र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १६४, अ.क्र. २३७, (यादी क्र. एस–३३), पावसाळी लाईन टाकणे, पान क्र. २५८, अ.क्र. ६, वॉर्ड क्र. १४ त्रिदल परिसरात पावसाळी लाईन टाकणे. | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. १४ त्रिदलनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १५ लाख |

**विषय क्रं. ४६२**

संदर्भ :- १) मा.वसंत मोरे व मा.संदिप लडकत यांचे दि. १३/१०/२००८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११९८ दि. ६/११/२००८.
३) मा.महा.आयुक्त यांनी क्र. मआ/मुले/१०४६ दि.१८/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय.
४) मा.अनिल भोसले, सभागृह नेते, मा.महादेव बाबर, मा.सुनिल बनकर, मा.विरेंद्र किराड, मा.दिलिप उंबरकर, मा.अशोक येनपुरे, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे, मा.सौ.अलका खाडे, मा.अनिल जाधव यांची दि. ६/१/२००९ ची उपसूचना.
५) स्थायी समिती ठराव क्र. १७५६, दि. ६/१/२००९.

---

Unregistered

मा.महा.आयुक्त यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये दिलेला अभिप्राय अवलोकन केला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

सहाव्या वेतन आयोगापोटी मे.राज्य शासनाच्या धोरणानुसार मनपा सेवक व सेवानिवृत्त सेवक यांना वेतन आयोगापोटी र.रुपये १५,०००/– (रुपये पंधरा हजार) उचल मान्य करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४६३**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त ठराव क्र. ६/४०६ दि. ३०/१/२००८.
२) वर्कऑर्डर क्र. ९७ दि. ८/५/२००८.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नउपअ(पोशि)/१०५४, दि. १९/१२/२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. १७८०, दि. ६/१/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

खोदाई चार्ज अनामत पोटी मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडलेल्या यादीनुसार जमा केलेल्या रकमेतून पोल शिफ्टींग विभागातील टेंडर अन्वये करावयाचे कामासाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) टेंडर क्र. ६४ अन्वये खरेदी केलेल्या केबलचे बी खोदाई पोटी जमा असलेले चलनेतून करण्यास
२) पोल शिफ्टींग विभागाकडून काढण्यात आलेल्या टेंडरचे बी खोदाई चलनातून करण्यास

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रं. ४६४**

संदर्भ :– १) मा.सुनिल गोगले यांचे दि. २९/१२/२००८ चे पत्र
२) स्थायी समिती ठराव क्र. १७८७, दि. ६/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १६ फुलेनगरमध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. २००, अ.क्र. ५१, शहरातील विविध क्रिडांगणामध्ये विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२८), पान नं. २९५, अ.क्र. ७, स.नं. ९० आदर्श इंदिरानगर येथे व्यायामशाळा बांधणे | १० लाख | ––– |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. १६ फुलेनगरमध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे. | ––– | १० लाख |

**विषय क्रं. ४६५**

संदर्भ :– १) मा.बाळासाहेब कापरे व मा.ॲड्.निलेश निकम यांचे दि. २९/१२/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १७८९, दि. ६/१/२००९.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १२८ मधील ब्रम्हा हॉटेल ते धनलक्ष्मी सोसायटी १२ इंची पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

Unregistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. ५९, नव्याने समाविष्ट झालेल्या ३८ गावांसाठी मलनि:सारण वाहिन्या टाकणे (यादी क्र. एमपी३), पान क्र. ५९, अ.क्र. १६, वॉर्ड क्र. १२८, स.नं. १३, १४ विठ्ठलनगर ते एकनाथनगर नाल्याच्या कडेने व अंतर्गत मलवाहिन्या टाकणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. १२८ मधील ब्रम्हा हॉटेल ते धनलक्ष्मी सोसायटी १२ इंची पाण्याची लाईन टाकणे. | --- | २० लाख |

**विषय क्रं. ४६६**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांची दि. ३०/१/२००१ ची मान्यता.
२) मा.बंडु गायकवाड यांचे दि. ७/४/२००८ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. ६६ दि. २२/४/२००८.
४) मा.नगर उपअभियंता जा.क्र. संसनर/१४४ दि. १५/११/२००८ चे पत्र.
५) मा.महा.आयुक्त यांनी क्र.मआ/उआ(भुजिं)/११०७ दि.२९/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय.
६) स्थायी समिती ठराव क्र. १७९४, दि. ६/१/२००९.

विषय :- पुणे शहरातील गोठे धारकांना मुंढवा स.नं. ६ येथे प्लॉटचे वाटप करणेबाबत.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

मुंढवा स.नं. ६ व ९ ते १४/२ येथील ले आऊटमधील गोठ्याचे प्लॉटचे नविन गोठे धारक यांना वाटप करताना त्यांचेकडून ३० वर्षे मुदतीसाठी नविन दराने प्रिमियम भाडे आकारणी करणेस तसेच सदर दरामध्ये मा.नगर अभियंता ठरवतील त्या नविन दरामध्ये ५०% सवलत देण्यास तसेच येरवडा, कोंढवा खुर्द, शिवाजीनगर, संगमवाडी, हडपसर, घोरपडी येथील गोठ्यांचे स्थलांतर करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेपुढे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४६७**

संदर्भ :- १) मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा.अजित आपटे यांचे दि. ५/१/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १८३२, दि. ६/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्रं. २२ कमलनयन बजाज उद्यानामधील पाटील इस्टेट झोपडपट्टी येथे ६ इंची पाण्याची लाईन टाकणेकामी २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १५०, अ.क्र. ४७, शहरात विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे, (यादी क्र. एस-१०), पान नं. २६४, अ.क्र. ७४, वॉर्ड क्र. २२ अश्विनी सोसायटी येथील रस्ते डांबरी करणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. २२ कमलनयन बजाज उद्यानामधील पाटील इस्टेट झोपडपट्टी येथे ६ इंची पाण्याची लाईन टाकणे. | --- | २० लाख |

UnRegistered

**विषय क्रं. ४६८**

संदर्भ :- १) मा.अशोक येनपुरे व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. ६/१/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १८४२, दि. ६/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त इतिहास प्रेमी मंडळ यांनी आयोजित केलेल्या क्रांती सुर्य सावरकर या महानाट्य प्रयोगाचे पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारावे आणि या कार्यक्रमासाठी पाच लाख रुपये देणगी देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशांवर तात्काळ पैसे देण्यात यावेत.

**विषय क्रं. ४६९**

संदर्भ :- १) मा.सुभाष जगताप व मा.सुनिल बनकर यांचे दि. ६/१/२००९ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १८४३, दि. ६/१/२००९.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. १२६ मधील विद्युत तारा भूमिगत करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८-०९ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणी संग्रहालये, | | |
| पान क्र. १९६, अ.क्र. ११०, पर्वती पाचगांव येथे वन उद्यान विकसित करणे. | ५० लाख | --- |
| (एकूण तरतूद ३ कोटी) | | |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. १२६ मधील विद्युत तारा भूमिगत करणे. | --- | ५० लाख |

**विषय क्रं. ४७०**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मअ/भुप्रा/८४३ दि. २०/११/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १५५३, दि. १०/१२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे शहरात जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण योजना, राष्ट्रकुल क्रिडास्पर्धा, अतिरिक्त आय.आर.डी.पी., बी.आर.टी. व इतर भूसंपादन अंतर्गत भूसंपादन कामी सन २००८-०९ चे अंदाजपत्रकातील सार्वजनिक वाहतूक सुधारणा व विशेष प्रकल्प विभागामार्फत करावयाची कामे (स्पेशल परपझ व्हेईकल) अंतर्गत र.रुपये १२५ कोटी उपलब्ध असून सदर तरतूदीमधून भूमिप्रापण विभागास वर्गीकरणाद्वारे र.रुपये २५ कोटी (अक्षरी र.रुपये पंचवीस कोटी) उपलब्ध करुन देणेकामीचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ४७१**

संदर्भ :- १) मा.बीओटी समितीची दि. २३/१/२००८ रोजीची मान्यता.

२) निविदा जाहिरात क्र. ५/६२ दि. २१/४/२००८

३) शुध्दीपत्रक जाहिरात क्र. ५/९२ दि. २९/४/२००८ (९९ वर्षाऐवजी ३० वर्षे व ३० वर्षानी पुन्हा ३० वर्षे असे ९० वर्षापर्यंत)

४) मुदतवाढ जा.क्र. ५/११९ दि. ८/५/२००८

५) मुदतवाढ जा.क्र. ६/१४४ दि. २६/५/२००८

६) मुदतवाढ जा.क्र. ६/२५९ दि. २/७/२००८

७) प्री.बीड मिटींग दि. ७/५/२००८
८) टेंडर ओपनिंग (पाकिट क्र. १) दि. ६/६/२००८
९) टेंडर ओपनिंग (पाकिट क्र. २) दि. १०/७/२००८
१०) मा.शहर अभियंता यांचे अध्यक्षतेखाली समितीची शिफारस
११) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/जनेयो(क्र.२) ८०४ दि. १४/११/२००८ चे पत्र.
१२) स्थायी समिती ठराव क्र. १३९६ दि. १८/११/२००८
१३) मा.संदिप लडकत, मा.वसंत मोरे यांचे दि. ६/१/२००९ चे फेरविचाराचे पत्र.
१४) स्थायी समिती ठराव क्र. १८३६ दि. ६/१/२००९.

---

स्थायी समिती ठराव क्र. १३९६ दि. १८/११/२००८ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पी.एम.सी.कॉलनी क्र. ६, गंज पेठ, फा.प्लॉट नं. २३०, टि.पी.एस III, टिंबर मार्केटजवळ, पुणे, बीओटी तत्वावर विकसित करणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी विकसनकर्ता अे.बी.कन्स्ट्रक्शन यांनी देवू केलेल्या सदनिका सर्वात जास्त (६३) असल्याने त्यांची निविदा स्विकारुन त्यांचेकडून निविदेतील खालील अटीनुसार सदर प्रकल्पाचे काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करार करणेस मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) सदरच्या जागा भाडेपट्टा तत्वावर द्यावयाच्या असून प्रथमत: ३० वर्षाचा करार करण्यात येईल. सदरचा करार याच अटीवर पुढील ९० वर्षापर्यंत वाढविणेचा आहे.

२) विकसकाला त्याच्या भागाच्या बांधकामासाठीचा नियमानुसार प्रिमियम व डेव्हलपमेंट चार्जेस भरणे आवश्यक आहे.

३) विकसकाला पुढील प्रत्येक वर्षी मनपाचे सर्व प्रकारचे कर भरणे बंधित राहील.

४) जागेचे विकसन हे बांधकाम नियंत्रण नियमावली १९८७ (जून १९९७ मधील सुधारणांसह) च्या आधिन राहून बांधकाम करणे आवश्यक आहे.

५) विकसकाला कोणत्याही प्रकारचा बाहेरचा टी.डी.आर.वापरता येणार नाही.

६) विकसनकर्त्याने पुणे मनपास द्यावयाच्या बांधकामाचे नियोजन विकसनकर्त्याच्या बांधकामाच्या नियोजनापेक्षा ६ महिने पुढे असणे आवश्यक आहे.

७) विकसनकर्त्याने मनपाने नेमून दिलेल्या वास्तू शिल्पकार व मनपाचे सुचनेनुसार संपुर्ण परिसराचे व बांधकामाचे विकसन करावयाचे आहे व त्यासाठी वास्तु शिल्पकार यांची फी संपूर्ण बांधकाम खर्चाच्या २.५०% प्रमाणे विकसन कर्त्याने अदा करावयाचे आहे.

८) विकसनकर्त्याने ५०% सुरक्षा ठेव वर्क ऑर्डर दिल्यापासून ३० दिवसात भरणे आवश्यक आहे व उर्वरित ५०% रक्कम इमारतीच्या नकाशा मंजूर झाल्यानंतर भरणे आवश्यक आहे.

९) मनपाच्या हिश्याचे संपूर्ण बांधकाम निविदा शर्तीस नमूद केलेल्या स्पेसिफीकेशनप्रमाणे करावयाचे आहे.

१०) सदरच्या कालावधीत आवश्यकतेनुसार सर्व सोयींनी युक्त असा ट्रांझिट कँप विकसकाने स्वखर्चाने बांधून देणे आवश्यक आहे.

११) भविष्यात उपलब्ध होणाऱ्या जादा चटई क्षेत्र निर्देशांकाचे संपुर्ण अधिकार मनपाचे राहतील.

१२) मनपाला मिळणाऱ्या सदनिका असलेली इमारती पुर्ण झाल्यावर दोन वर्षे देखभाल व दुरुस्ती विकसकाने स्वखर्चाने करावयाची आहे.

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. १३९६ दि. १८/११/२००८ चा निरस्त करण्यात येत आहे.

Unregistered

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**